**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय**
**कार्यपत्रिका क्रमांक ४**
**सभावृत्तांत**

दिनांक:- १५ / ७ / २०१५ वेळ. दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची फ प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक १५ / ०७ / २०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा. सौ. बो-हाडे शुभांगी संजय सभापती
२. मा. सौ.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा. श्री.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू
४. मा. श्री. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा. सौ.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.श्री. सायकर अजय शंकरराव
७. मा. सौ. जाधव साधना रामदास
८. मा. श्री. जाधव राहुल गुलाब
९. मा.श्री.बहिरवाडे नारायण सदाशिव
१०. मा. सौ.पवार संगीता शाम
११. मा. सौ.(चिखले) मराठे अश्विनी अजित
१२. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
१३. मा.श्री.मासुळकर समीर मोरेश्वर

याशिवाय श्री.दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी, श्री.सतिश इंगळे कार्यकारी अभि.(स्था), डॉ.सतिश गोरे पशू वैद्यकिय अधिकारी, श्री.नायकवाडी बी.एस. (लेखापाल), श्री.राणे आर.व्ही.,उप.अभि. (स्था), श्री.प्रदीप पुजारी, उप.अभि. (स्था.झोनिपू), श्री.गायकवाड श.म., उप.अभि. (स्था), श्री.डी.बी.सपताळे, उप.अभि. (वि) श्री. हनुमंत शिंदे, उप.अभि. (ज.नि.), श्री.नरोटे एस.एल. उप अभि.(स्था),श्री.महाजन के.एस. उपअभियता (पापु), श्री.जाधव व्ही.के. उपअभियंता (स्थापत्य उद्यान), श्री.गायकवाड पी.एम.उद्यान अधिक्षक, श्री.दाते टी.एच (सहा.आरोग्याधिकारी), श्री.मोरे चंद्रकांत चिंधा हॉर्टी. सुपरवायझर, श्री.ई.एच.बंडवल हॉर्टी.सुपरवायझर, श्री.शितोळे एस.के. कनिष्ठ अभियंता, श्री.तरवडे बी.डी.अतिक्रमण निरीक्षक, श्रीम.प्रभावती गाडेकर मुख्य लिपिक इ. अधिकारी सभेस हजर होते.

मा.सभापती यांनी सर्वांचे स्वागत करुन सभा सुरु करावी असे सांगितले. दि.८/५/२०१५ व १२/६/२०१५ (कार्यपत्रिका क्र.२), दि. १२/६/२०१५ (कार्यपत्रिका क्र.३) चा सभावृत्तांत कायम करणेत आला.

सन्मा.सदस्य/सदस्या यांनी खालील मुद्दयांवर चर्चा केली.

**मा.नारायण बहिरवाडे** :-

१. शाहूनगर मधील स्ट्रीट लाईटने पुरेसा प्रकाश मिळत नाही. नागरिकांच्या तक्रारी वाढत आहेत त्यात सुधारणा करणेकामी सुचीत केले.

२. श्री.घोसाळकर वायरमन कामे करीत नाही.
श्री.सपताळे डी.बी. उपअभियंता यांनी आऊट सोर्सच्या वायरमनकडून कामे करुन घेण्यात येईल.

३. वायरमनची सकाळची डयुटी रद्द करुन फक्त रात्रपाळीची डयुटी लावावी.

४. जीममध्ये असलेला वीजपुरवठा MSED C.L. ने बंद केला आहे. तो मनपा अधिका-यांनी बील भरुन मीटर बसवून चालू करावा.
श्री.सपताळे डी.बी. उपअभियंता MSED C.L कडून मीटर घेवुन लाईट चालू करणेत येईल.

५. मोकाट व भटकी जनावरे पकडून इतरत्र सोडणे
पशु वैद्कीय अधिकारी यांनी मोकाट व भटकी जनावरे पकडून इतरत्र सोडणेत येतील असे सांगितले.

६. शाहूनगर,संभाजीनगर येथे पाणीपुरवठा सुरळीत नाही.
श्री.किशोर महाजन:- नागरी सुविधा केंद्र मधून अर्ज वेळेत संबंधित विभागास प्राप्त होत नाहीत. वाढीव कनेक्शन दिल्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत होत नाही.
मा.क्षेत्रीय अधिकारी:- श्री. महाजन यांनी CFC ला पत्र देणे

७. बकेट वाटप अर्धवट राहिले.
मा.क्षेत्रीय अधिकारी:- जेवढया प्राप्त झाल्या त्या सर्वांचे वाटप झाले. नवीन मागणी केलेली आहे.
**मा.सभापती**:- प्रत्येक नगरसेवकाला बकेट वाटपाची यादी देणे
श्री. दाते:- शौचालय सर्वेक्षण झालेवर ८ दिवसांत दिले जातील

८. शाहू गार्डनमध्ये टॉयलेट व कचरा टोपली नाही.

**मा.शांताराम भालेकर:-** १. पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. पाण्याचा विस्कळीतपणा, ग्रामीण भागात पाणी फार कमी प्रमाणात सोडणेत येते
२. स्थापत्य:- रस्त्यावरील खड्डे बुजविणे.

**मा.अश्विनी चिखले**:- से.क्र.२२ पोलीस चौकीची मागणी आहे. आंबेडकर वसाहतीजवळ मुलींची छेडछाड होत आहे.
श्री. गावडे:- झोनिपु विभागाकडे अर्ज करावे लागेल.

**मा.संगीता पवार:-** ड्रेनेज लाईनचे चोकअप काढण्यासाठी ठेकेदारांकडील कर्मचारी माझे वॉर्डातील नागरिकांकडे पैशाची मागणी करतात. से.क्र.२२ स्वामी विवेकानंद येथे मोठे ड्रेनेज लाईन चे काम झाले आहे का ? संयोगनगर ची बॉर्डर, ताम्हाणेवस्ती येथील ड्रेनेज लाईनचे काम अपूर्ण आहे.

**मा.राहुल जाधव:-** आरोग्य, से.क्र.१६ सावतामाळी कचराकुंडया शिफ्ट केल्यावर "येथे कचरा टाकू नये" असा बोर्ड लावणे

२. ज्या ज्या ठिकाणी गटर चोकअप होते. वारंवार तेथे स्थापत्य व आरोग्य या दोन्ही विभागांनी मिळून काम करावे.

३. बोलाई मळा, जांभूळकर विशाखा हॉटेल येथे ड्रेनेज चोकअप झालेनंतर पाणी रोडवर येते.

४. किरकोळ मेन्टेनन्सची कामे करणे

५. लोंढे वस्ती/ गावठाण, बोलाई वस्ती येथे पाणी २ तास पण प्रेशरने येत नाही. शिवेच्या रस्त्यावर लाईट लावणे

६. ग्रामीण भागात जनावरांचा दवाखाना चालू करणे. डॉ.गोरे - यासाठी शासनाकडे मागणी करणेत येईल.

७. सेक्टर १६ मधील रोडला आलेले झाडे तोडणे.दुभाजकामधील झाडांची छाटणी करणे. छाटणी न केल्याने अपघात होतात.

८. पाणीपुरवठा सुरळीत झालेनंतर सर्व सोसायटयांमध्ये वृक्षारोपण करणे

९. बालाजीनगर वजन काटयाजवळचे ड्रेनेज चोकअप काढणे

**मा.सुरेश म्हेत्रे** :- संभाव्य वृक्षारोपण कार्यक्रमाची माहिती सांगावी.उदयान विभागामार्फत अद्यापपर्यंत खेळणी दिलेली नाही. तळवडे चौकात खेळणी वेल्डींग करुन बसविणे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी**:- १. डेंग्युची काळजी घेण्यासाठी सर्वेक्षण चे काम सुरु आहे. डेंग्युचे रुग्ण सापडले तर श्री. दाते सहा. आरोग्य अधिकारी यांच्याशी संपर्क साधून जनजागृती करणे

२. आधारकार्डसाठी जनजागृती करणे

३. प्रत्येक झोपडपट्टीतून २५ जणांना ४,००० स्वच्छतागृहाकरीता अनुदान देण्याची सोय आहे.

४. कृष्णानगर – भाजी मंडईसाठी अर्ज १३४ गाळे – ४२ गाळयांना प्रतिसाद मिळाला आहे

५ स्मार्ट सिटी करीता फुटपाथ वरील हातगाडयांना प्रतिबंध घालणे.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१ प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवनाचे पहिल्या मजल्यावरील एम.पी.एस्.सी/ यु.पी.एस्.सी.अभ्यासिकेस **"शहीद हेमंत करकरे स्पर्धा परीक्षा केंद्र"** असे नामकरण करणेबाबत.
मा. अश्विनी मराठे व मा. संगीता पवार यांचा प्रस्ताव

विषय क्र.२ प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील नाना – नानी पार्क मधील व्यायाम शाळेची जागा ज्येष्ठ नागरिक संघासाठी नाना – नानी पार्क मधील हॉल वापरास देणेबाबत. (उद्यमनगर, नेहरुनगर)
मा.मंदाकिनी ठाकरे व मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव

विषय क्र.३ रुपीनगर - तळवडे परिसरातील महिला बचत गटांतील महिलांना भक्ती शक्ती येथे व्यवसायासाठी गाडी उभी करणेबाबत.
मा पौर्णिमा सोनवणे व मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव

विषय क्र.४ नामकरणामध्ये दुरुस्तीबाबत. गजानन म्हेत्रे उद्यान म्हेत्रेवाडी कृष्णानगर असे आहे. परंतू, या ठिकाणी काही भाग हा मैदानाचा असल्यामुळे वरील नावामध्ये **गजानन म्हेत्रे उद्यान व मैदान,म्हेत्रेवाडी– कृष्णानगर** असा बदल करणेबाबत.
मा.नारायण बहिरवाडे व मा. अजय सायकर यांचा प्रस्ताव

विषय क्र.५ तरतुद वर्गीकरणाबाबत.
मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.फक्षेका/वि/१/कावि/३२७/२०१५, दि.१५/७/२०१५ चा प्रस्ताव

ठराव क्र.७ विषय क्र.१
दि. १५/७/२०१५ विभाग:-
सुचक:- मा. अश्विनी मराठे अनुमोदक:- मा. संगीता पवार
संदर्भ:- मा. अश्विनी मराठे व मा. संगीता पवार यांचा दि. १५/७/२०१५ चा प्रस्ताव
विषय:- नामकरण ठराव मंजूर करणेबाबत.

प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवनाचे पहिल्या मजल्यावरील एम.पी.एस्.सी/ यु.पी.एस्.सी.अभ्यासिकेस **"शहीद हेमंत करकरे स्पर्धा परीक्षा केंद्र"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.८ विषय क्र.२
दि. १५/७/२०१५ विभाग:-
सुचक:- मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक:- मा.समीर मासुळकर
संदर्भ:- मा. मंदाकिनी ठाकरे व मा. समीर मासुळकर यांचा दि. १५/७/२०१५ चा प्रस्ताव
विषय:- ज्येष्ठ नागरिक संघासाठी नाना-नानी पार्क मधील हॉल वापरास देणेबाबत.

प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील नाना – नानी पार्क मधील व्यायाम शाळेची जागा ज्येष्ठ नागरीक संघास कायम स्वरुपी वापरास देणेबाबत ज्येष्ठ नागरिक संघ नेहरुनगर, जुना टेल्को रोड,पिंपरी पुणे १८ अध्यक्ष श्री.गुंडाप्पा टेकुर यांनी अर्ज केले आहे. सध्या ही व्यायाम शाळा वापरात नसुन त्या ठिकाणी साहित्य नाही. सदर हॉल रिपेअर करुन हया भागातील ज्येष्ठ नागरीक संघास कायमस्वरुपी वापरास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.९ विषय क्र.३

दि. १५/७/२०१५ विभाग:-

सुचक:- मा. पौर्णिमा सोनवणे अनुमोदक:- मा.साधना जाधव

संदर्भ:- मा. पौर्णिमा सोनवणे व मा.साधना जाधव यांचा दि. १५/७/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- महिला बचत गटातील महिलांना भक्ती शक्ती येथे व्यवसायासाठी गाडी उभी करणेबाबत.

रुपीनगर तळवडे परिसरातील महिलांच्या बचत गटांतील महिलांना भक्ती शक्ती येथे व्यवसायासाठी गाडी उभी करायची आहे. ती गाडी भक्ती शक्ती महिला बचत गटातर्फे उभी करण्यात येणार आहे.तरी याकरीता या महिलांना तेथे व्यवसायासाठी गाडी उभी करण्याकरीता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.१० विषय क्र.४

दि. १५/७/२०१५ विभाग:-

सुचक:- मा. नारायण बहिरवाडे अनुमोदक:- मा. अजय सायकर

संदर्भ:- मा. सुरेश म्हेत्रे यांचा दि. १५/७/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- नामकरणामध्ये दुरुस्तीबाबत.

महानगरपालिकेचे प्लॉट नं.३ ,सेक्टर २०, म्हेत्रेवाडी – कृष्णानगर, चिखली येथील उद्यानाचे "**गजानन म्हेत्रे उद्यान म्हेत्रेवाडी - कृष्णानगर**" असे आहे. परंतू, या ठिकाणी काही भाग हा मैदानाचा असल्यामुळे वरील नावामध्ये "**गजानन म्हेत्रे उद्यान व मैदान, म्हेत्रेवाडी-कृष्णानगर**" असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.११ विषय क्र.५

दि. १५/७/२०१५ विभाग:-

सुचक:- मा. राहुल जाधव अनुमोदक:- मा. साधना जाधव

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.फक्षेका/वि/१/कावि/३२७/२०१५ दि.१५/७/२०१५ चा प्रस्ताव

विषय:-तरतुद वर्गीकरणाबाबत.

फ क्षेत्रीय कार्यालयाचे विदयुत विभागाकडील सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामध्ये "अस्थायी आस्थापना" या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ करीता र.रु. ७५,०००/- तरतुद करणेत आलेली आहे. मनपाकडून नियुक्त होणा-या शिकाऊ उमेदवारांना अदा करावयाच्या विद्यावेतनाबाबत क्र. प्रशासन/११/कावि/७३५/२०१४ दि. १०/१०/२०१४ नुसार र.रु. २८००/- ऐवजी नवीन दर र.रु.७३१४/- (९० % ) मासिक विद्यावेतन करणेत आले आहे. त्यामुळे या विभागाकडील उपलब्ध तरतुद अपूरी पडत आहे. माहे मार्च २०१५ अखेर याकरीता २,५०,०००/- खर्च अपेक्षीत आहे.विद्युत विभागाचे टायरटयुब खरेदीसाठी ३,३३,०००/- तरतूद केलेली आहे. दि. ३०/६/२०१५ अखेर खर्च झालेला नाही. सबब सदर टायरटयूबसाठी केलेल्या तरतुदीमधून तूर्त र.रु. २,५०,०००/- अस्थायी आस्थापनेवर वर्ग करणेस आवश्यक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली करता येत असल्याने सदरच्या तरतूद वर्गीकरणाचे विषयास मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

......

मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
मा.सौ.शुभांगी संजय बो-हाडे
सभापती
फ क्षेत्रीय कार्यालय

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/१०१/२०१५
दि. १५/०७/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत:- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना